**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. ०३/२००८/ दिनांक :

१) श्री. मधुकर भाऊ ऐवळे, अर्जदार
मु.पो. पेनुर, ता. मोहोळ
जि. सोलापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, ऊर्जा नगर,
मुरारजी पेठ, सोलापूर– ००१

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग, सोलापूर

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभागीय कार्यालय, मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. जी.सी. लेले, सदस्य यांचेतर्फे दिनांक ०६.०३.२००९

श्री. मधुकर भाऊ ऐवळे, रा. पेनुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांची गट क्र. ६६७/२ येथील शेतीतील ग्राहक क्र. ३४५०४०२२६७३४ चे ३ एचपी शेतीपंपाचे बिलाबाबत तक्रार आहे. संदर्भात फॉर्म ' क्ष ' मध्ये दि. ३.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली. .परंतु कक्षाने दखल न घेतल्याने ' अ ' फॉर्ममध्ये दि. ३.१.२००९ रोजी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल येथे अर्ज दाखल केला. सदर कामी मुद्देनिहाय अभिप्राय वि.प.कडून दि.२२.१.२००९ च्या पत्राने मागितला व त्यानंतर सोलापूर सर्कल येथील कार्यालयात सुनावणी केली. सुनावणीचयोवेळी स्वत: तक्रारदार श्री. मधुकर ऐवळे व त्यांचा मुलगा श्री. लक्ष्मण तसेच वि.प.तर्फे श्री. मिसाळ एस.एन., सहाय्यक अभियंता, मोहोळ उपस्थित होते.

ग्राहकाचा मूळ तक्रार अर्ज, हजर केलेली कागदपत्रे, सुनावणीचेवेळी केलेली कथने व दाखल केलेले म्हणणे या सर्वांचा विचार करता, तक्रारीचे स्वरुप व वि.प.चे म्हणणे खालील प्रमाणे –

ग्राहकाचा तक्रार अर्ज तपशील

श्री. मधुकर भाऊ ऐवळे यांनी मु.पो. पेनुर येथील गट क्र. ६६७/२, या आपल्या स्वत:च्या शेतीत दि. २.९.१९९४ पूर्वी वीज जोडणीची मागणी केली. सदर गटामध्ये शासनाच्या १००– अनुदानातून ' जीवनधारा जवाहर आय.आर.डी.पी. दशलक्ष ' नावाची योजना पंचायत समिती, मोहोळ यांच्यामार्फत १९८९–९० साली राबविली होती. विहीर पूर्ण झाल्यावर उपसा करण्यासाठी वीज पंप व इतर साहित्य शासनच पुरवणार होते. तसेच वीज जोडणी हि शासनामार्फतच दिली जाणार होती. तथापी सदर योजना ' कागदावरच पूर्ण ' झाल्याने विहीर पूर्ण नाही, वीज पंप बसविला नाही, त्यामुळे जोडणी नाही. तथापी कागद पूर्ण झाल्याने तसेच ' फिक्स्ड रेटने ' बील येणार असल्याने जागेवर जावून प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे याची कोणीच पाहणी`ली नाही. कागदावरची प्रक्रिया पूर्ण झाल्याने वीज बील येत गेले. सदरचे रु. ३५,०००/– चे बील अमान्य आहे ते पूर्णपणे रद्द व्हावे अशी तक्रार आहे. अर्जदारास दिलेले संबंधित बील हे रु. ३८,४८०/– असे आहे.

वि.प.ने वीज जोडणी दिलेली आहे. त्यामुळे वीज बिलाची बाकी भरावी लागणार अशी भूमिका घेतली.

अर्जदाराचा तक्रार अर्ज व इतर कागदपत्रे व सुनावणीच्या वेळची कथने यावरुन तक्रारीचे स्वरुप पाहता, मी खालील निष्कर्षाप्रत आलो आहे.

श्री. मधुकर ऐवळे यांना शासनाने १००% अनुदानातून १९८९–९० साली सदर ' जवाहर योजनेत ' सामील करुन घेतले. पंचायत समिती मोहोळ यांच्यातर्फे विहीर खुदाई चालू केली. प्रत्यक्षात विहिरीची खुदाई व बांधकाम पूर्ण झालेले नाही. तसेच विहिरीत पाणी नाही. शासनाने दिलेला पंपसेट तसाच पॅक अवस्थेत घरात आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. शासनाच्या आदेशामुळे व उद्दीष्टपूर्तीसाठी वीज जोडणीची तयारी पूर्ण केली पण प्रत्यक्षात वीज जोडली नाही. जा.क्र. पिसमो/कृषि/जावयो/७४२/९४ मोहोळ दि. ९.२.१९९४ चे गट विकास अधिकारी वर्ग १ पंचायत समिती मोहोळ यांच्या पत्रातील विषयाकडे लक्ष दिल्यास असे लक्षात येते की, तत्कालीन एमएसईबीकडे तपासणी अहवाल, अे १ फॉर्म इ. दाखल करुन वीज जोडणी घ्यावी असे त्याचे स्वरुप होते. सदरची जबाबदारी श्री. ऐवळे यांची आहे असे दि. ९.२.१९९४ च्या पत्राने कळविले आहे. म्हणजेच त्या तारखेपर्यंत सदरची आवश्यक कागदपत्रे वीज मंडळाकडे जमा नव्हती. तथापी वीज बिलावर जोडणी दि. २.९.१९९४ हाच आहे. त्यामुळे जोडणीबद्दल शंका येते. तसेच दि. १०.२.२००९ रोजी सुनावणीच्यावेळी वि.प.स तक्रारी संदर्भात मंचाने लेखी माहिती मागितली होती. सदरची माहिती दि. २०.२.२००९ पर्यंत वि.प.कडून मंचास मिळावी असे स्पष्ट लिहीले होते.

त्यामध्ये प्रत्यक्षात वीज पुरवठा पंपासाठी केला होता काय ? ग्राहकाने मागणी संदर्भात दाखल तपासणी अहवाल, ग्राहकाचे सीपीएल व महत्वाची माहिती मागितली होती. तथापी दि. ६.३.२००९ पर्यंत कोणतीही कागदपत्रे मंचात दाखल केलेली नाहीत. तसेच मंचाने मागितलेल्या मुद्देनिहाय अभिप्रायही दिला नाही. त्याचप्रमाणे ग्राहकानेही केंद्रीय माहिती अधिकारा अंतर्गत दि. ३.१०.२००८ रोजी माहिती मागितली आहे. त्या अर्जासही माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिलेले नाही. सर्व तपशिलाचा विचार करता, खालील मुद्दे विचारार्थ येतात.

१) प्रश्न :– श्री. ऐवळे यांना प्रत्यक्षात शेतीपंपाचे वीज जोडणी झाली आहे काय ?
उत्तर :– नाही

२) प्रश्न :–वि.प.ने आपल्या म्हणण्या बरोबर मंचाने मागितलेली आवश्यक कागदपत्रे दाखल केली आहेत काय ?
उत्तर :– नाही

३) प्रश्न :– वीज जोडणी केवळ कागदावरच झाल्याने पूर्ण बील तसेच मुळ जोडणी रद्द करणे योग्य आहे काय ?
उत्तर :– होय

४) आदेश ?
अखेरच्या आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

आवश्यक असणारे पेपर पूर्ण केल्यावरसुध्दा वि.प.कडून जोडणी दिली जात नव्हती व नाही. मागणी करुनही मंचास महत्वाचे कागदपत्रे दाखल केलेली नाहीत हि बाब अत्यंत गंभीर आहे. तक्रारदाराने 'क्ष' फॉर्ममध्ये तक्रार दाखल करुनही अंतर्गत कक्ष सोलापूर सर्कलने निर्णय केला नाही. याची मंचाने विशेष नोंद घेतलेली आहे. मुद्देनिहाय अभिप्राय दाखल करणेबद्दलही असाच निष्काळजीपणा दाखविला आहे. दिनांक ९.२.१९९४ पासून तक्रार दाखल होईपर्यंत व नंतरही एकहीवेळा ग्राहकाने बिलाची रक्कम जमा केलेली नाही. थकबाकी संदर्भात इतक्या प्रदीर्घ काळात वि.प.ने कोणती कारवाई केली याचा खुलासा नाही. जर वीज पुरवठा चालू असता तर ग्राहकाने त्याचा फायदा घेतला असता, तथापी ७/१२ पत्रकी ' पीकपाहणी नोंद ' तपासता फक्त ज्वारीचेच पीक घेतलेले दिसते.

परिणामी, वितरण कंपनीकडे संबंधित मोटर पंपाचा चाचणी अहवाल व पाहणी अहवाल नाही. तसेच प्रत्यक्ष वीज जोडणी बाबतचे कागदपत्र हजर केलेले नाहीत. अशावरुन कायद्यातील गृहीत तत्वानुसार असे सिध्द होते की, अर्जदाराचे मोटरपंपा संबंधात चाचणी अहवाल न तपासता केवळ कागदोपत्री वीज जोडणी दाखविलेली आहे व पुढे बिलाची आकारणी केवळ कागदोपत्रीच करण्यात आलेली आहे. सन १९९४ नंतर पुढे कधीही विजेची बिले अर्जदाराने भरलेली नाहीत अशी वस्तुस्थिती असतांनाही वि.प.तर्फे कोणतीही कार्यवाही संबंधित बिलाव्यतिरिक्त करण्यात आलेली नाही.

वरील सर्व बाबी ध्यानात घेवून श्री. मधुकर ऐवळे यांना दिलेले रु. ३८,४८०/– असे दिलेले बील रद्द करणे आवश्यक आहे. तसेच सदरची कागदावरील जोडणी नोंदही रद्द करणे आवश्यक आहे. एकूण अर्जदाराचा तक्रारी अर्ज मंजूर करुन त्यास न्याय देणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) श्री. मधुकार ऐवळे यांची कागदोपत्री नोंद असलेली पण प्रत्यक्षात कार्यान्वीत नसलेली ग्राहक क्र. ३४५०४०२२६७३४ ची जोडणी रद्द करण्यात येत आहे.

२) तसेच सदर जोडणीवर प्रथमपासूनची सर्व व अखेरचे रु. ३८,४८०/– सह अर्जानंतरची पुढील सर्व बिले रद्द करण्यात येत आहेत.

३) ग्राहकास वीज जोडणीची आवश्यकता असलेस त्याने नियमाप्रमाणे वितरण कंपनीकडे अर्ज करावा व त्यावर वितरण कंपनीने एस.ओ.पी. प्रमाणे कार्यवाही करावी.

४) या अर्जाचे खर्चाबाबत आदेश नाही.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०६.०३.२००९

के.वाय. जगताप, अध्यक्ष, :

एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :